**नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे नेमणूकीच्यावेळी अधिक असलेले वय क्षमापनाबाबतचे अधिकार प्रादेशिक संचालकांना प्रदान करण्याबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**आदेश क्र. नपप्रसं/४/२०-एलए/१/वय शिथिल/२००४/प्र.क्र.३९३/(५)२६**
**दिनांक : १३ जानेवारी २००६**

**प्रस्तावना**

०१ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ (१) नुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पदनिर्मित्तीचे अधिकार तसेच कलम ७६ (२) नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पदांची अर्हता, वेतन, भत्ते व सेवेच्या शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पध्दती विहित करण्याचे अधिकार संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना आहेत.

०२ पदनिर्मिती करतांना प्रत्येक पदासाठी शैक्षणिक आर्हता/वयोमर्यादा इत्यादी नमूद केले जाते व पदभरतीसाठी अटी व शर्तीचे नगरपरिषदेने पालन करणे बंधनकारक आहे. तसेच या कार्यालयाचा आदेश क्र. ईएसटी-११८४/प्र.क्र.२१/६, दि.१४.५.१९८४ अन्वये नगरपरिषद कर्मचाऱ्याना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केले असून त्यामध्ये विहित केलेल्या पध्दतीने भरती करणे आवश्यक आहे.

०३ अशा स्वरुपाची विधीग्राहय कार्यवाही न करता काही वेळा नगरपरिषदांनी विहित वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केलेल्या आहेत. अशा प्रकरणात लेखा परिक्षणात आक्षेप घेतल्यानंतर वयोमर्यादा शिथिल करण्याचे प्रस्ताव या कार्यालयाकडे वेळोवेळी प्राप्त होतात. साधारणरित्या अशा प्रकारची प्रकरणे नाकारण्यात येतात. तसेच नगरपरिषदेकडून प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यास वेळ लागतो. हा वेळ कमी व्हावा म्हणून काही ठराविक अटी व शर्ती च्या अधीन राहून वयोमर्यादा शिथिल करण्याचे अधिकार प्रादेशिक संचालक यांना प्रदान करण्याचा प्रस्ताव या संचालनालयाच्या विचाराधीन होता.

०४ उक्त बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

०५ नेमणूकीच्या वेळी विहीत वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असणाऱ्या नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्याच्या सेवाप्रवेशाच्या वेळी अधिकतम असलेले वय शिथिल करण्याची कार्यवाही विनाविलंब होण्याकरीता या प्रकरणी क्षेत्रिय पातळीवर निर्णय घेणे शक्य व्हावे म्हणून संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई हे त्यांना प्राप्त असलेले महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ (२) खालील अधिकार या आदेशाद्वारे प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना प्रदान करीत आहे.

०६ सदरहू वयोमर्यादा शिथिल करण्याचे प्रस्तावास विहित वयोमर्यादापेक्षा अधिक वयाच्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका का करण्यात आल्या याबाबत खालील स्पष्टीकरणासह सबळ कारण आहे याची खात्री केल्यानंतर मान्य करता येतील.

अ) नगरपरिषदांनी विहीत पध्दतीचा अवलंब करुन नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याचे नेमणूकीच्यावेळी असलेले अधिक वय क्षमापित करणेत यावे. (विहित मार्गाने आलेले नसल्यास या कार्यालयाचे आदेश क्र. नपप्रस /१ ते ६ /१ ते ३४ / न. प. सर्व /अनियमित धोरण /२००५ /प्र. क्र.-३८९ /२६, दि. १६.५.२००५ मधील परिशिष्ट-एक प्रमाणे)

ब) नगरपरिषद आस्थापनेवर ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती जिल्हा निवड मंडळामार्फत करण्यात आलेली आहे अशा कर्मचाऱ्यांचे वय क्षमापित करता येईल.

क) दि.१.७.१९८६ ते दि.३१.१२.२००५ या कालावधीतील कर्मचाऱ्यांबाबत नगरपरिषदेने पदभरती करतांना किमान दोन वेळा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सुध्दा उमेदवार उपलब्ध झाले नसतील, तसेच सेवायोजन कार्यालयाकडे किमान दोन वेळा मागणी करुन व निवड प्रक्रियेव्दारे उमेदवार उपलब्ध झाले नसतील अशा

परिस्थितीत नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे वय विहीत मर्यादेत नसेल परंतू सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधील अटी पूर्ण करीत असतील तर अशा कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा शिथिल करण्यात यावी.

०७ या कार्यालयाचे आदेश दि. २०.४.२००१ अन्वये नगरपरिषदेच्या आस्थापनेवर दि. १०.३.१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्यानुसार, अशा सामावून घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे वय विहीत मर्यादेत नसल्यास त्यांची वयोमर्यादा शिथिल करण्यात यावी.

०८ उक्त प्रमाणे अटींची पुर्तता न करणा-या व कुहेतुने व पक्षपातीपणाने केलेल्या नेमणूकां प्रकरणी औद्योगिक कलह कायदा १९४७मधील कलम २५ (फ) (ह) मधील तरतूदीचे परिपूर्ण पालन करुन त्याच्या सेवा संपुष्टात आणाव्यात व अशा नेमणूकीस जबाबदार असणाऱ्या संबंधित पदाधिकारी / अधिकारी यांच्याकडून या कार्यालयाचे आदेश क्र. नपप्रसं/अनियमित-रोजंदारी /वसुली/२००५/प्रक्र-५५५/२६, दि. १२.७.२००५ नुसार जबाबदारी निश्चित करुन झालेल्या नुकसानीची वसुली करावी.

०९ नगरपरिषदेने नेमणूकीच्या वेळी विहीत वयामर्यादेपेक्षा अधिक वयाच्या नियुक्ती केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा आढावा घेवून प्रथम नियुक्तीच्या वेळी नियमानुसार अन्य सर्व अटी पुर्ण करीत असलेले मात्र फक्त वयोमर्यादा विहित मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या प्रकरणांचा आढावा घेवून प्रस्तुत आदेशाच्या दिनांकांपासून तीन महिन्याचे आत अशा सर्व प्रकरणांचा एकत्रित प्रस्ताव संबंधित प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त याजकडे सादर करण्यात यावा. उक्त प्रमाणे मुदतीत प्रस्ताव सादर न करण्याच्या प्रकरणी होणाऱ्या विलंबास व त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस संबंधित नगरपरिषद आस्थापना प्रमुख व मुख्याधिकारी हे संयुक्तरित्या जबाबदार राहतील.

१० नविन भरती करतांना विहीत वयोमर्यादेचा विचार काटेकोरपणे करण्यात यावा, तथापि एखादे पद भरतांना विहीत पध्दतीचा अवलंब दोन पेक्षा अधिक वेळा करुनही विहीत वयोमर्यादेतील उमेदवार उपलब्ध होत नसेल अशा प्रकरणी वय शिथिल करुन भरती करण्याचा प्रस्ताव असल्यास सर्व कागदपत्रांसह व कारणांसह प्रादेशिक संचालक याजंकडे सादर करुन त्यांची पूर्व मंजूरी घेंवून त्या नंतरच अशा कर्मचांऱ्याची नेमणूक करणेची आहे. कुठल्याही परिस्थितीत वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव विचाराल घेण्यात येऊ नयेत. भविष्यात विहीत वयोमर्यादेत न बसणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यास व त्यामुळे न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यास आस्थापना लिपिक व मुख्याधिकारी यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात यावे व त्यांच्याविरुध्द दि. १२.७.२००५ चे परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

११ अशा प्रकरणांमध्ये काही अडचणी उदभवल्यास त्याबाबत या कार्यालयाकडे मार्गदर्शनासाठी संदर्भ करावा.

( सुनील सोनी )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,
१) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व), २) जिल्हाधिकारी (सर्व), ३) मुख्याधिकारी (सर्व),
४) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व), ५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय.

## परिशिष्ट - अ

वरील प्रमाणे वयामर्यादा शिथिल करतांना सदर कर्मचारी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

i) नगरपरिषद आस्थापनेवर पद मंजूर असणे आवश्यक आहे.

ii) नगरपरिषदेने विहीत पध्दतीचा अवलंब करुन नियुक्ती केलेले असावेत.

iii) विहित मार्गाने भरती करणेसाठी कमीत कमी दोन वेळा प्रयत्न करुनही पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही.

iv) हे कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्र धारण करीत असले पाहीजेत.

v) हे कर्मचारी उत्तम चारीत्र्य असल्याबाबत व त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा प्रलंबित नसल्याची खातरजमा करण्यात यावी.

vi) हे कर्मचारी शारिरीकदृष्टया कामास पात्र व सक्षम असल्याबाबतचे सक्षम वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.